बातमीपत्र

# पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर

**माहिती कक्ष, दि ०१ मे २०२४**

## जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २०७/२०२४ भादवि २७९,३३७,३३८, मोवाकाक १७७,१३४(ब) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १५/०४/२०२४ रोजी १४.१५ वा ते १४.३० वा चे दरम्यान, अल्लाबक्ष बेकरी जवळ, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ३०/०४/२०२४ रोजी १७.५५ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | उमरदास मोहमद शरिफ मुल्ला, वय- ४२ वर्षे, रा. ८१, रविवार पेठ, फैजुलबारी मस्जिद जवळ, राजेंद्र चौक, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | कार क्रं. एम एच १५ ई बी ३०५७ चा अज्ञात चालक |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचा पुतण्या अब्दुला हा मोटार सायकल क्रं. एम एच १३ सी डी ५१४३ वरुन मागे बसवुन, फिर्यादी मोटार सायकल चालवत पानगल हायस्कुल ते राहते घराकडे जात असताना, नमुद ठिकाणी आले असता, तेथे रोडवर उभे असलेल्या वरील कारचा अज्ञात चालक याने त्याच्या ताब्यातील वाहन हयगयीने, निष्काळजीपणाने, रोडचे भान न ठेवता, मागे न पाहता अचानक कारचा दरवाजा उघडल्याने त्यात मोटार सायकलला जोरात कारचा दरवाजा लागुन फिर्यादी व पुतण्या खाली पडुन दोघास जखमी करण्यास कारणीभुत झाला आहे. तसेच अपघाताची खबर न देता व उपचारास घेवून न जाता परस्पर निघुन गेला आहे म्हणून. तपास:- पोना/ १३२४ चव्हाण |

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २५९/२०२४ भादवि ३८०,४५४,४५७ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २८/०४/२०२४ रोजी १४.०० वा ते २०.०० वा चे दरम्यान, फिर्यादीचे राहते घरी, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ३०/०४/२०२४ रोजी १४.१९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | श्रीनिवास लक्ष्मण उकरंडे, वय- ४९ वर्षे, रा. ३३, गडगी नगर, जुना विडी घरकुल, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | ७१,०००/- रु त्यात ५ ग्रॅम चे सोन्याचे कर्णफुले, ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे बुगडी, १० ग्रॅम वजनाचे चांदीचे निरंजन व रोख रक्कम |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचे राहते घरी कोणी नसताना, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे घरामध्ये प्रवेश करुन, फिर्यादीचे संमतीशिवाय घराचे लाकडी दरवाज्याचे कुलुप कशानेतरी तोडुन, कपाटातील वरील वर्णनाचे व किंमतीचे सोने व चांदीचे दागिने व रोख रक्कम चोरुन नेले आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ ७४५ डोके- ९८२३८१३०३१ |

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | २६०/२०२४ भादवि ३७९ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि २५/०४/२०२४ रोजी ०५.०० वा ते ०५.१५ वा चे दरम्यान, शिवशक्ती चौक, एमआयडीसी, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि ३०/०४/२०२४ रोजी १४.३९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | अर्जुन बाबुराव कोकणे, वय- ४१ वर्षे, रा. २०७, कलावती नगर, सुनिल नगर, एमआयडीसी, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | **:** | ४५,०००/- रु लाल रंगाची होंडा युनिकॉर्न मोटार सायकल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीची वरील वर्णनाची व किंमतीची मोटार सायकल क्रं. एम एच १३ ई एच ९९०१ ही फिर्यादी वापरत असलेली व मित्र रवि मैनावाले यांचे मालकीची मोटार सायकल ही वरील ठिकाणी पार्क केली असता, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे संमतीवाचून, मुद्दाम लबाडीने चोरून नेली आहे म्हणून. तपासः- पोहेकॉ/ ६२५ उबाळे- ९९६७४३७८२२ |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ९०७/२०२४ भादवि ३२४,५०४,४२७,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि २९/०४/२०२४ रोजी २३.०० वा चे सुमारास, मोदी स्मशान भुमी १ गेट जवळ, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि ३०/०४/२०२४ रोजी २०.२३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | सचिन विवेक इगलोर, वय- २३ वर्षे, रा. ८/७७, मोदी हुडको, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | १) विशाल चिलवादी, २) सुदर्शन कांबळे, ३) अरुण पेद्दी |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी व मित्र कुनशीकर व बोलेदल्लु असे शौचालयास जाण्याकरीता नमुद ठिकाणी गेले असता, तेथे वरील आरोपीत मजकुर आले व विनाकारण शिवीगाळ करत हाताने, लाथाबुक्यांनी बांबुने मारण्यास सुरुवात केली. सदर मारहाणीत फिर्यादीचे डाव्या हातास जखम, खांदयास खरचटल्याने व डाव्या पायास मुका मार लागला असुन मित्र कुनशीकर यास मुक्का मार लागला व बोलेदल्लु यास पाठीत व बरगडीत मुका मार लागला आहे. तसेच तिघांजवळील मोबाईल तोडफोड करुन नुकसान केले आहे म्हणून. तपासः- मपोना- १४१२ वाघमोडे-७५१७५१७०२७ |